# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

बायपास रोड, कॅम्प, अमरावती - ४४४६०२
दूरध्वनी ०७२१-२६६२०३४/२५५२९२३
फॅक्स ०७२१-२६६२७८२
ईमेल: amravati_divcom@rediffmail.com
वेबसाईडhttp://amravatidivision.gov.in

क्रमांक : आकाअ/म.शा.४/प्र.क्र.२६०/२०२०

दिनांक: २६/०२/,२०२०

## विधी अधिकारी (कंत्राटी) पदभरती जाहिरात -२०२०

विभागीय आयुक्त, अमरावती यांचे कार्यालयातील **विधी अधिकारी (कंत्राटी)** हे एक पद भरणे आहे. सदर पद ११ महिन्यांच्या कंत्राटी तत्वावर शासनाव्दारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीनूसार तसेच नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व महसूल विभागात काम करण्यास इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. उमेदवारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती (महसूल शाखा) बायपास रोड, कॅम्प, अमरावती -४४४६०२ या पत्त्यावर दि. ०९/०३/२०२० पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचेल अशा रितीने पाठवावा. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सविस्तर जाहिरात, शैक्षणिक अर्हता, अनुभव, वयोमर्यादा, विधी अधिकारी यांची कर्तव्य व जबाबदारी, अर्ज करण्याची पध्दत व अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे इ. माहिती व विहित अर्ज नमुना या कार्यालयाचे संकेतस्थळ http://amravatidivision.gov.in या वेबसाईटर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अध्यक्ष
विभागीय निवड समिती
तथा विभागीय आयुक्त, अमरावती

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती**
**(विधी अधिकारी - कंत्राटी पदभरती)**

**क्र.आकाअ/म.शा.४/वि.अ./कावि- २६७ /२०२०** **दि. २६ फेब्रुवारी, २०२०**

---

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ ई-८, दि.१४ नोव्हेंबर, २०१३ (सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१३१११४१६३९१५४५१९ असा आहे) नुसार विभागीय आयुक्त कार्यालयासाठी विधी अधिकारी यांचे ०१ (एक) पद पूर्णपणे कंत्राटी पध्दतीने मानधनावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथील विधी अधिकारी हे पद निवळ कंत्राटी पध्दतीने मानधनावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरावयाचे आहे. करीता सदर पदासाठी पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून विहीत नमून्यात **दि. ०९ . ०३.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** अर्ज मागविण्यात येत आहेत.

---

| | | |
|---|---|---|
| पदाचे नाव | :- | **विधी अधिकारी (कंत्राटी)** |
| पदसंख्या | :- | ०१ (एक) |
| मासिक मानधन | :- | एकत्रित मानधन रुपये ३०,०००/- + दुरध्वनी व प्रवास खर्च रु.५०००/- असे एकत्रित मानधन रुपये रु.३५,०००/- प्रतिमाह देय होईल. याव्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय्य होणार नाही. |

**शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

(१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदविधर असेल.तो सनदधारक असेल
(२) विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
(३) उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबत ज्ञानसंपन्न असणे आवश्यक,ज्यामुळे कायद्येविषयक कार्यवाही कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.
(४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक.
(५) विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीचेवेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**विधी अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

(१) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
(२) महसूल विषयक/ परिच्छेदनिहाय अभिप्राय (Parawise Comments) तयार करणे/ सेवाविषयक / प्रशासकीस बाबी / विभागीय चौकशी इत्यादी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
(३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासनाचा प्रतिवादी आहे, अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.
(४) शपथपत्राचा मसूदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल, याची दक्षता घेणे.

(५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

(६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसूदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकीलाकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

(७) सर्व न्यायालयीन प्रकरणांसाठी विभागीय स्तरावर "नोडल ऑफिसर" म्हणून काम पाहणे.

(८) विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

**नेमणूकीचे स्वरुप :-**

विधी अधिकारी हे पद नियमित स्वरुपात नसून **११ महिन्याकरिता पुर्णत: कंत्राटी पध्दतीने भरण्यात येईल. विधी अधिकारी हे पद शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.**

**उमेदवारांना आवश्यक सूचना:-**

(१) वरीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभवामधील अ.क्र.१ ते ५ बाबतची सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या स्वाक्षांकीत प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज अपात्र ठरेल

(२) वरील अनुभवातील अ.क्र.४ करिता मराठी व इंग्रजी भाषेच्या ज्ञानाची पडताळणी करण्यासाठी आवश्यकता भासल्यास तोंडी मुलाखती घेण्यात येतील.

(३) वरील अनुभवातील अ.क्र.३ करिता उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनीक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायद्येविषयक कार्यवाही याबाबतचे उमेदवाराचे विशेष प्राविण्य पडताळणीसाठी आवश्यकता वाटल्यास लेखी चाचणी घेण्यात येईल.

(४) सदर जाहिरात व त्यासोबत अर्ज व प्रतिज्ञापत्राचा विहीत नमूना या कार्यालयाचे संकेतस्थळ www.amravatidivision.in येथे प्रसिध्द करण्यात आलेले आहे. उमेदवारांनी त्याच नमून्यात **A-4** आकाराच्या कागदावर एका बाजूस टंकलिखीत / मुद्रीत करुन विहीत मुदतीत खालील पत्त्यावर **दि.०९.०३.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील अशा बेताने पाठवावे.**

(५) वरील नमून्यातील अर्ज लखोटयात बंद करुन लखोटयावर कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी पदासाठी अर्ज अशा उल्लेखासह सादर करावेत.

(६) निवड झालेल्या उमेदवारास शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएसटी-२०१३/प्र.क्र.१७३/ई-८, दि.१४.नोव्हेंबर, २०१३ मध्ये विहीत केलेल्या नमून्यातील करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

(७) कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या उमेदवारास दररोज संपूर्ण कार्यालयीन वेळेत कामकाज करावे लागेल.

**अर्ज पाठविण्याचा पत्ता** :- विभागीय आयुक्त कार्यालय (महसूल शाखा)
जूना बायपास रोड, कॅम्प, अमरावती-४४४ ६०२

**स्थळ : अमरावती**
**दिनांक: २७ .०२.२०२०**

**अध्यक्ष**
**विभागीय निवड समिती**
**तथा विभागीय आयुक्त, अमरावती**

# विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती
कॅम्प रोड, अमरावती
दूरध्वनी ०७२१-२६६२०३४/२५५२९२३ फॅक्स ०७२१-२६६२७८२
ईमेल : amravati_divcom@rediffmail.com वेबसाईट : http://amravatidivision.gov.in


## विभागीय आयुक्त कार्यालय, अमरवती
## विधी अधिकारी (कंत्राटी पध्दतीने) पदासाठी अर्ज

कार्यालयीन वापरासाठी

| | |
|---|---|
| अर्ज क्रमांक:- | |
| दिनांक:- | |

अर्जदाराचे अलीकडील काळातील राजपत्रीत अधिकारी यांनी सांक्षाकीत केलेला फोटो चिटकवावा

प्रति,

मा. विभागीय आयुक्त,
अमरावती

विषय:- **विधी अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणुकीबाबत अर्ज.**

--oo--

उक्त जाहिरातीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालयातील विधी अधिकारी या पदावर नेमणुक करण्याकरीता अर्ज करीत असून माझा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अर्जदाराचे पुर्ण नाव (आडनाव प्रथम लिहावे) | :- | | | | |
| २ | पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोड/दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वणी/ई-मेल आयडी) | :- | | | | |
| ३ | जन्म दिनांक (शालांत परिक्षा प्रमाणपत्राप्रमाणे) | :- | दि. | महिना | वर्ष | |
| ४ | अर्जदाराची जात व प्रवर्ग | :- | | | | |
| ५ | जाहिरातीचे दिनांकास वय | :- | वर्ष | महिने | दिवस | |
| ६ | महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ? (आवश्यक कागदपत्रे जोडणे) | :- | होय / नाही | | | |
| ७ | विवाहित/अविवाहित | :- | | | | |
| ८ | उमेदवार पुरूष अथवा स्त्री | :- | पुरूष | | स्त्री | |
| ९ | विवाहित असल्यास लहान कुटंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे काय ? (आवश्यक असल्यास प्रमाणपत्र जोडावे) | :- | होय | | नाही | |
| १० | बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवा यांचेकडील सनद क्रमांक व दिनांक | :- | | | | |
| ११ | अर्जदाराची शैक्षणिक पात्रता | :- | | | | |

| अ. क्र. | शैक्षणिक अहर्ता | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | परिक्षा मंडळाचे नाव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

अनुभव :-

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | पद | अनुभवाचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

संगणक अर्हता तपशिल व इतर गुणवत्ता:-

| अ.क्र. | संगणक अहर्ता | संस्थेचे नाव | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

- अर्जसोबत जोडण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची यादी.

१. ................................................
२. ................................................
३. ................................................
४. ................................................
५. ................................................

मी, याव्दारे प्रमाणित करतो / करते की, माझ्या माहितीनुसार वरील तपशिल सत्य आणि अचूक आहे. या माहितील कोणताही तपशिल चूकीचा / खोटा आढळल्यास माझा अर्ज रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी

# प्रतिज्ञापत्र

## नमूना-अ (नियम-४ पहा)

मी, श्री./श्रीमती/कु.------------------------------------------------
श्री------------------------------------------- यांचा /यांची मुलगा/मुलगी/पत्नी
वय ----वर्षे---------------- राहणार ------------------------------------------------
याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

(१) मी---------------------------------------या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ----------------------(संख्या) इतकी हयात अपत्ये आहेत.
त्यापैकी दि.२८.०३.२००५ यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या ------- आहे.
(असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा)

(३) हयात असलेल्या अपत्यांची संख्या २ पेक्षा अधिक असेल तर, दि.२८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक :

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी